**प्रतिवादी तर्फे साक्षीदार नं. १ चा पुढील सरतपास विधीज्ञ एस. एस. मुजावर यांचे वतीने सुरु**

साक्षीदाराला नि. ३ सोबत अ.नं. २ वरील प्रमाणीत वाटप तक्ता दाखविला. सदर वाटप तक्त्याला निशानी देणेस वादीचे विधीज्ञ यांनी आक्षेप घेतला की, त्या वाटप तक्त्याला वादी पक्षकार नाही त्यामुळे त्यास निशानी देवू नये. सदर वाटप तक्ता प्रमाणीत असल्याने आक्षेप नोंदवून त्यास **नि. ११३** देणेत येते. नि. १०८ सोबत अ.नं. १ सोबत दाखल रे.क.नं. १२८/१९९१ चे प्रमाणीत दावा व हुकूमनामेची प्रमाणीत प्रत दाखविली. त्यास निशानी देणेस वादीचे विधीज्ञांनी आक्षेप नोंदविला की वादी त्यात पक्षकार नाहीत. आक्षेप नोंवून त्यास **नि. ११४, ११५, ११६** देणेत येते. नि. १०८ सोबत अ.नं. ४ वरील अप्पर जिल्हा धिकारी कोल्हापूर यांचा न्यायनिर्णय दाखविला. त्यास निशानी देणेस वादीचे विधीज्ञांनी आक्षेप नोंदविला की सदर न्यायनिर्णय हे वादी पक्षकार नसलेल्या हुकूमनामेवरुन झाले असल्याने त्यास निशानी देवू नये. आक्षेप नोंवून त्यास **नि. ११७** देणेत येते. नि. १०८ सोबत अ.नं. ५ वरील प्रांताधिकारी इचलकरंजी यांचा न्यायनिर्णय दाखविला. त्यास निशानी देणेस वादीचे विधीज्ञांनी आक्षेप नोंदविला की सदर न्यायनिर्णय हे वादी पक्षकार नसलेल्या हुकूमनामेवरुन झाले असल्याने त्यास निशानी देवू नये. आक्षेप नोंवून त्यास **नि. ११८** देणेत येते.

**सरतपास पूर्ण.**

**प्रतिवादी तर्फे साक्षीदार नं. १ चा उलटतपास वादी तर्फे विधीज्ञ व्ही. पी. चुडमुंगे यांचे वतीने सुरु .**

२. रामा जकाप्पा कुरणे माझे वडिल होय. त्यांना मी मुलगा व संगीता ही मुलगी आहे. इंदुबाई मनोहर चव्हाण कोण आहेत ते मला माहित नाही. इंदुबाई चव्हाण रामा कुरणे याची कोण आहे याची मी चौकशी केली नाही. नि. ११४ वरील कागद मी का हजर केले ते मला माहित नाही. रामा व इंदुबाई यांच्यातील रे.क.नं. १२८/१९९१ बाबत नि. ११५ व ११६ वरील दावा व हुकूमनामा का हजर केला ते मला माहिती नाही. नि. ११४ ते ११६ वरील कागद कशाचे आहेत याबाबत मी कोणाकडूनही माहिती घेतली नाही. त्याबाबत वकिलांकडून माहिती घेतली नाही. सदरची कागदपत्रे मी कोणतीही माहिती न घेता काढले. हे खरे आहे की, सदर माहिती नसलेल्या कागदपत्रा

आधारे अप्पर जिल्हाधिकारी कोल्हापूर व उपविभागीय अधिकारी इचलकरंजी यांच्याकडे मी कामे चालविली. सोनाबाई रामा कुरणे ही माझी आई आहे. संगीता सुभाष मोरे ही माझी बहिण आहे. जयश्री बाबासो चव्हाण कोण आहे ते मला माहित नाही. सिध्दांत बाबासो चव्हाण, पाराबाई धोंडीराम कांबळे हे कोण आहेत ते मला माहित नाहीत. हे खरे आहे की, वॉर्ड नं. १ घर नं. १२८ मध्ये कोण राहते ते मला माहिती नाही. ताराबाई अशोक नाडे, हिराबाई रामचंद्र ढोबळे हे कोण आहेत ते मला माहित नाही. असे काय घडले नाही की, वर नमूद मला माहित नसलेल्या लोकांसोबत मी अप्पर जिल्हाधिकारी कोल्हापूर व उपविभागीय अधिकारी इचलकरंजी यांचेकडे कामे चालविली. रे.क.नं. १२८/१९९१ मध्ये श्रावण कांबळेचे वारस पक्षकार होते. महादेव, अभिमन्यू, पल्लवी, राधा, माधवी, शुंभागी व पुंडलिक या दावेतील वादी हे रे.क.नं. १२८/१९९१ मध्ये पक्षकार नव्हते. हे मला माहित नाही की, यशवंत कुरणे यांना श्रावण, दादू व जकाप्पा असे वारस होते. हे खरे आहे की, श्रावणला महादेव व पुंडलिक असे वारस आहेत. हे खरे नाही की, दादूने त्याचा हिस्सा विकला आहे. हे खरे नाही की, जकाप्पाला रामा व इंदूबाई असे वारस होते. हे मला माहित नाही की, इंदूबाईला बाबासाहेब, प्याराबाई, ताराबाई, हिराबाई व बाबासाहेबाचे वारस जयश्री व सिध्दांत असे वारस होते. हे खरे नाही की, माझे व श्रावणचे वारस यांचेत वाद नाहीत. महादेवने केलेला दावा मी पाहिला आहे. साक्षीदाराला दाव्यातील दावा मिळकतीचे वर्णनाखाली असलेला समजूतीचा नकाशा दाखविला असता रस्त्याकडची जमीन त्याची असलेचे सांगितले. समजूतीच्या नकाशाचे मधला भाग हा दादू यशवंत कुरणे याचा असलेचे मान्य केले. समजूतीच्या नकाशामध्ये तीसरा भाग श्रावण कुरणेचा नसलेचे सांगतो. साक्षीदार समजूतीच्या नकाशामध्ये दाखविलेला पश्चीमेकडील भाग दादू कुरणेचा असलेचे सांगतो. दादू कुरणेला एकच भाग दिला आहे. हे मी सांगू शकत नाही की, माझा व दादूचा भाग सोडून समजूतीच्या नकाशातील तिसरा भाग श्रावण, अभिमन्यू यांचेकडे आहे. महादेव, श्रावण यांच्या नावे जवाहर सारखान्याला गेलेले ऊसाची बीले व

कागदपत्रे मी पाहिली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडून श्रावण व त्याची मुले संमतीपत्र घेवून गेलेनंतर त्यांचा ऊस कारखान्याला जातो. माझा ऊस जवाहर साखर कारखान्याला जातो. हे म्हणणे खरे आहे की, श्रावणची मुले महादेव व पुंडलीक यांचा ऊस जवाहर साखर कारखान्याला जातो. माझ्या जमीनीचे क्षेत्र २१ आर आहे. हे म्हणणे खरे नाही की, महादेव व पुंडलीक यांचे क्षेत्र २१ आर आहे. हे मला माहित नाही की, इचलकरंजी न्यायालयाने माझे व अन्य चार जनाविरूध्द महादेव व पुंडलीक यांचे २१ आर क्षेत्राला हरकत करू नये म्हणून मनाई केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, महादेव व पुंडलीक यांचे सदर २१ आर क्षेत्र म्हणजे पश्चिमेचे क्षेत्र. हे म्हणणे खरे आहे की, मी पश्चिमेकडील २१ आर क्षेत्रामध्ये जात नाही. फेरफार क्रमांक ३८१४५ मध्ये इंदूबाई चव्हाण यांचे नाव आलेचे मला माहिती नाही. इंदूबाई चव्हाण मला माहित नसलेल्या व्यक्तीकडून मी कधीही जमीन काढून घेतलेली नाही. इंदूबाई व रामा यांचा कोर्टात वाद होता. तो वाद म्हणजे वडील रामाने इंदूबाईकडे त्यांचा हिस्सा मागितला होता. इंदूबाई रामाची मुलगी असलेचे मला माहिती नाही. कैफियत मधील परीच्छेद क्रमांक ४ मधील मजकूर की, २१ आर क्षेत्र प्रतिवादी क्रमांक १ च्या मालकी व स्वंतत्र कब्जा वहिवाटीस आलेचा मजकूर बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या कैफियत मधील परीच्छेद क्रमांक ४ मधील शेवटचा मजकूर की, माझ्या नावे तुटक २१ आर क्षेत्र ७/१२ पत्रकी आले आहे हा मजकूर बरोबर आहे. कैफियत मधील पान क्रमांक ४ मधील मजकूर की, इंदूबाई चव्हाण व तीचे तर्फे इसमांनी मला मालकी कब्जे वहीवाटीस हरकत अडथळा केला म्हणून रे.क.नं. २८६/२००४ चा दावा इंदूबाई विरुध्द केलेचा बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, इंदूबाई चव्हाण हिने आमच्या विरूध्द खोटया मजकूराचा इचलकरंजी न्यायालयात रे.क.नं. ११५/२००८ चा दावा केला हा मजकूर बरोबर आहे. तो दावा नामंजूर झालेचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे २१ आर क्षेत्र रामा जक्काप्पा कुरणे याचे नावे आली. जयश्री चव्हाण हिने तिच्या निशाणी क्रं. ३४ वरील कैफियत मध्ये पान क्रं. २ परिच्छेद क्रं. ४

मधील यशवंता भुजंगा कुरणे यांना जकाप्पा, दादू व श्रावण असे वारस असलेचे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, जयश्री चव्हाण हिने जकाप्पाला रामा व इंदूबाई वारस असलेचे नमुद केले आहे व ते मला मान्य आहे. जयश्री चव्हाण हिने दि. १५/०२/२००२ रोजी तहसीलदारकडे अर्ज केलेचे मला माहिती नाही. जयश्री चव्हाण इंदूबाई चव्हाणचे वारस आहेत. सर्वे नं. ४८४/२ ला १ हेक्टर २२ आर क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादींची नावे श्रावणचे पश्चात ७/१२ ला नोंद व्हावीत म्हणून काम चालू आहे व त्यामध्ये मी पक्षकार आहे. हे म्हणणे खरे आहे की, श्रावणचे पश्चात महादेव व पुंडलीक यांची नावे लागणेस माझी हरकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ ला रामा व इंदूबाई चे नाव २१ आर क्षेत्राला नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, जकाप्पाचे पश्चात रामा व रामाचे पश्चात माझेकडे २१ आर क्षेत्र कब्जेत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१६ मध्ये वादीचे नावाची नोंद ७/१२ उतारेला नसलेने वादीची ऊसाची तोड थांबविली होती. दावेमध्ये इंदूबाईचे वारसांची नावे नमूद आहेत. प्रतिवादी क्रं. २ ते ५ यांनी वादीचे ऊसाची तोड थांबविलेचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये ऊस जाताना वाद होतो. हे म्हणणे खरे नाही की, चुकीच्या नोंदीमूळे २६/२०१६ चे काम कलम १५५ खाली नोंद दुरूस्ती करीता चालू आहे. श्रावणच्या पश्चात महादेव व पुंडलिक यांच्या नावाची नोंद वारसाने करणेस माझा हरकत नाही. हे खरे नाही की, जिल्हाधिकारी कार्यालयापर्यत नाव दुरुस्तीचे काम मी चालविले नाही. हे खरे आहे की, श्रावणच्या पश्चात महादेव व पुंडलिक यांच्या नावाची नोंद वारसाने करणेस माझा हरकत नाही. हे खरे नाही की, महादेव व पुंडलिक यांच्या नावाची नोंद लागलेस संपूर्ण वाद मिटेल. हे खरे आहे की, सव्हे नं. ४८४/२ चे क्षेत्र १ हे. २२ आर असताना त्याचे क्षेत्र ४२ आर नोंद झाले आहे. हे खरे नाही की, सदर ४२ आर क्षेत्र चुकीचे नोंदले आहे. हे खरे नाही की, ४२ आर क्षेत्राचा स्वतंत्र ७/१२ झाला आहे. हे मला माहित नाही की, ४२ आर क्षेत्राचे ७/१२ करुन आम्ही व इंदूबाईने दावे खेळले व त्या आधारे आम्ही सदर जमिनीवर हक्क सांगत आहे. हे खरे आहे की, जकाप्पा कुरणे

यांनी अंतिम हुकूमनामा क्र. ४/२००२ न्यायालयातून करुन घेतला आहे व त्याप्रमाणे २१ आर क्षेत्र आमच्याकडे आले आहे. त्या २१ आर क्षेत्रामध्ये इंदूबाईचा संबंध नाही हे मी सांगू शकत नाही. हे खरे आहे की, मी इंदूबाईला आमच्या २१ आर क्षेत्रामध्ये येवू देणार नाही. हे खरे नाही की, जक्काप्पा व इंदूबाई यांच्यामध्ये २१ आर क्षेत्र होते. हे खरे आहे की, इंदुबाईचे ७/१२ नाव मालकी नसताना आहे. मी पुंडलिक व महादेव यांच्या हिस्सेत असलेल्या मिळकतीबाबत तक्रार केलेली नाही. हे खरे नाही की, ७/१२ वर चुकीच्या नोंदी झाल्या आहेत. जकाप्पाला तिसरा हिस्सा आहे. हे खरे नाही की, जकाप्पाला रामा व इंदूबाई हे दोन वारस आहेत. हे खरे नाही की, रामा व इंदूबाई यांचे २१ आर असे तिस-या हिस्सेचे क्षेत्र आहे. हे खरे आहे की, माझ्या वडिलांपासून मी एकटा वारस म्हणून इंदूबाईला काही दयायचे नाही असे मी म्हणतो. हे खरे आहे की, इंदूबाईला आम्ही काही दिलेले नाही म्हणून रामा व इंदुबाईमध्ये भांडण आहे. हे खरे आहे की, माझे व पुंडलिक व महादेव यांचे भांडण नाही. हे खरे नाही की, वादीला त्रास देणेसाठी मी कैफियत व कागदपत्रे हजर केली आहेत. हे खरे नाही की, मी व इंदूबाईने एकमेका विरुध्द न्यायालयात खोटे दावे दाखल केले आहेत. हे खरे आहे की, त्या दाव्यामध्ये श्रावणचे वारसांना पक्षकार केलेले नाही. हे खरे नाही की, ७/१२ च्या नोंदीवरुन मी खोटा जबाब देत आहे. श्रावणचा तिसरा हिस्सा आहे. त्याच्या हिस्सेमध्ये मला हक्क नाही. हे खरे नाही की, ७/१२ च्या चुकीच्या नोंदीवरुन वादीला हरकत करता म्हणून हा दावा दाखल केला आहे. हे खरे नाही की, वादीचा त्रास देणेकरीता खोटा जबाब देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेर तपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/–

**(डॉ.डी.जी.पटवे )**

दिनांक – ०९/१०/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, इचलकरंजी.